# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००८९८/२०/अ. क्र. ६०८/२३/०१**

**श्री. प्रशांत कांबळे,**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ वसाहत अधिकारी, जी/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, झोपडपट्टी सुधारणा खाते,
तळमजला (खोली क्र.१४), महानगरपालिका इमारत, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग महापालिका कार्यालय,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०६.२०२३**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.०७.२०१९ | ०७.०८.२०१९ | ०४.१०.२०१९ | ०४.११.२०१९ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २०.०२.२०२० रोजीच्या अर्जान्वये कोणतेही कारण नमूद न करता द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. ३०.०७.२०१९ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

"भारत गॅरेज ब्लॉक नं.१२, ९० फिट रोड कामराज शाळे जवळधारावी १२ नंबर गल्ली मुंबई ४०००१७. सुरुवातीपासून आजपर्यंत

१) वरील गाळयाचे क्षेत्रफळ किती आहे व किती फोटोपास दिलेले आहेत याची माहिती देण्यात यावी.

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००८९८/२०/अ. क्र. ६०८/२३/०१**

२) लांबी रुंदी उंची किती आहे याची माहिती देण्यात यावी तसेच ते वापरत असलेल्या क्षेत्रफळापैकी वाणिज्यिक किती व निवासी किती याची माहिती देण्यात यावी.

३) निमयाप्रमाणे वाणिज्यीक / निवासी वापरासाठी उंची किती असावी लागते याची माहिती दयावी.

४) तसेच उंची जास्त असल्यास त्यावर काय कारवाई केली जाते याची माहिती देण्यात यावी.

५).सदर गॅरेजच्या बाजूला पीच लायसन्स दिले होते का जर असेत तर ते कोठे आहे याची माहिती देण्यात यावी.

६) या गॅरेजवर किती नोटीस जारी केलेल्या आहेत व किती तक्रारी आलेल्या आहेत याची माहिती देण्यात यावी.

वरील सर्व माहिती छायांकित प्रतीत प्रमाणित करून देण्यात यावीत."

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि.०७-०८-२०१९ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.०४-११-२०१९ संलग्न केले आहेत.

**जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७-०८-२०१९ रोजी खालीलप्रमाणे उत्तर दिले :**

"आपण दि.३०-०७-२०१९ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये, केलेला अर्ज मला जन माहिती अधिकारी म्हणून दि.०२-०८-२०१९ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जात आपण मागणी केलेल्या माहितीबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपण मागितलेल्या माहितीचा नीट अर्थबोध होत नाही तरी आपणांस नेमकी कोणत्या झोपडी क्रमांकाबाबत माहिती हवी आहे हे नमूद केलेले नाही. तसेच आपण योग्य झोपडी क्रमांक दिल्यास आपणांस माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य होईल. यास्तव, आपला दिनांक ३०-०७-२०१९ रोजीचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे."

**प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४-११-२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले :**

"अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार कायदा नियमानुसार सादर केलेल्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने अपिलार्थी असमाधानी असल्याचे निदर्शनास येते. अपिलार्थी यांनी त्यांचे माहितीचा अधिकार कायदा अंतर्गतच्या अर्जामध्ये झोपडी क्रमांक नमूद केला नसल्यामुळे अपिलार्थीस नेमक्या कोणत्या गाळ्याची माहिती अभिप्रेत आहे याचा बोध होत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान सांगितले. अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या गाळ्याचा झोपडी

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००८९८/२०/अ. क्र. ६०८/२३/०१**

क्रमांक नमूद करुन जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात पुनःश्च माहितीचा अधिकार कायदा अंतर्गत अर्ज सादर करावाअपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहितीचा अधिकार कायदा अंतर्गत अर्ज सादर केल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अभिप्रेत असलेली माहिती अग्रप्राधान्याने द्यावी.

उपरोक्त आदेश पारित करुन, अपीलार्थीनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेला उपरोक्त अपील अर्ज निकाली काढण्यात येतो."

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी सादर केले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही.

माहिती अधिकारी यांनी सादर केले की, संबंधित माहिती मालमत्ता विभागाशी संबंधित आहे. तथापि, माहिती अर्ज वेळेवर मालमत्ता विभागाला हस्तांतरीत करण्यात आलेला नाही. या कारणामुळे माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/उत्तर यांनी संबंधित विभागाकडून उपलब्ध माहिती प्राप्त करुन अपिलार्थीला १५ दिवसात निःशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/उत्तर यांनी संबंधित विभागाकडून उपलब्ध माहिती प्राप्त करुन अपिलार्थीला १५ दिवसात निःशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

सुनील पोरवाल

**(सुनील पोरवाल)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १६.०६.२०२३**